रजि. नं. पुक्षे/पंसप/पु. पू. मं./सा./ २०४/
२००९-२०११/एल. डब्ल्यू. पी. /१९६,
क्र. पी. एच. एम./एस. आर./१९२/VIII/२००१.
रजि. नं. आरएनआय/एमएएचबीआयएल/०५७७७/
१३-१-२००९/टीसी.
www.yerawadaprisonpress.com

किंमत : रुपये ७.००

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष-१, अंक-२७ ] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १ ते सप्टेंबर ७, २०११/भाद्र १० ते भाद्र १६, शके १९३३ [ पृष्ठे ११

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक–अ—पुणे विभागीय पुरवणी

**(भाग ४-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ पुणे विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)**

**टीप.----प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.**

---

**१**

**महापालिका आयुक्त यांजकडून**

**पुणे महानगरपालिका, पुणे**

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५४ व ४५५ अन्वये*

***नोटीस***

क्रमांक जसंका/८२२/२०११.--महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, शासन निर्णय, क्रमांक पीएमसी-३०१०/प्र. क्र. ३९४/२०१०/नवि-२२, दिनांक ९ ऑगस्ट २०१० अन्वये पुणे महानगरपालिकेस निर्देश प्राप्त झालेले आहेत. पुणे महानगरपालिका हद्दीत जाहिरात फलक लावण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून "पुणे महानगरपालिका नवीन जाहिरात धोरण-२०१० किंवा आकाशचिन्ह नियंत्रण नियमावली २०१०" चा मसुदा तयार करण्यात आलेला आहे ;

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत जाहिरात फलक लावण्यासाठी/उभे करण्यासाठी "पुणे महानगरपालिका नवीन जाहिरात धोरण २०१० किंवा आकाशचिन्ह नियंत्रण नियमावली २०१०" तयार करून निर्देशित कालमर्यादेत महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ४७९, दिनांक १८ फेब्रुवारी २०११ व पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३४३, दिनांक १८ ऑगस्ट २०११ अन्वये सदरच्या मसुद्यास मान्यता दिलेली आहे ;



परवाना व आकाशचिन्ह विभाग
आवक क्रमांक:-L 1036
दिनांक:- 3/9/11

उपआयुक्त (अतिक्रमण)
पुणे महानगरपालिका

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५४ व ४५५ अन्वये "पुणे महानगरपालिका नवीन जाहिरात धोरण २०१० किंवा आकाशचिन्ह नियंत्रण नियमावली २०१०" चा मसुदा जाहीर करावयाचा इरादा आहे.

त्याअर्थी, "पुणे महानगरपालिका नवीन जाहिरात धोरण २०१० किंवा आकाशचिन्ह नियंत्रण नियमावली २०१०" चा मसुदा नागरिकांच्या अवलोकनार्थ मा. उप आयुक्त (अतिक्रमण), परवाना व आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका, खोली नंबर २४३, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवलेला आहे. "पुणे महानगरपालिका नवीन जाहिरात धोरण २०१० किंवा आकाशचिन्ह नियंत्रण नियमावली २०१०" च्या मसुद्याबाबत नागरिकांच्या सूचना किंवा हरकती असतील तर, त्या सदरची नोटीस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत मा. महापालिका आयुक्त, शिवाजीनगर, पुणे-५ यांचेकडे लेखी स्वरूपात दाखल केल्यास त्याचा पुणे महानगरपालिका विचार करेल.

## पुणे महानगरपालिका आकाशचिन्ह जाहिरात नियमावली-२०१०

### १. प्रस्तावना

(१) पुणे शहरात विविध प्रकारे आकाशचिन्ह प्रदर्शित केली जातात. त्या अनुषंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये जाहिरात व फलक नियंत्रण नियम २००३ नमूद आहेत. तथापि शहराच्या आकाश सौंदर्यास बाधा उत्पन्न होऊ नये तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या भिन्न आकाराच्या जाहिरातीमुळे शहराचे सौंदर्यात विद्रुपीकरण होऊ नये म्हणून जाहिराती प्रदर्शित करणेबाबत नव्याने धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. सध्या महानगरपालिकेकडून देण्यात आलेल्या आकाशचिन्ह परवान्याची मुदत सप्टेंबर २०१० अखेर संपुष्टात येत असल्याने व महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्तोतमध्ये वाढ करणे आवश्यक असल्याने शासनाने प्रस्तुत केलेल्या अधिनियमातील क्रमांक जी. ई. एन. १०९७/१६/प्र. क्र. ३८/९७/नवि-२७, दिनांक ९ जून २००३ नियमावलीस कोणतीही बाधा न करता नवीन धोरण निश्चित करण्यात येत आहे.

(२) सार्वजनिक हित लक्षात घेऊन महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८ नुसार व जाहिरात व फलक नियंत्रण नियमावली २००३ चे कलम ४ *(१)* अन्वये खालीलप्रमाणे नियमावली प्रस्तुत करीत आहेत. खालील नियम हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे २४४, २४५ व जाहिरात नियंत्रण नियमावली २००३ चे अधिन राहून सामान्यत: तयार करण्यात आले असून, त्यामध्ये पुणे शहरातील स्थानिक परिस्थितीनुरूप अत्यावश्यक आहेत, त्याव्यक्तिरिक्त बदल करण्यात आलेला नाही.

(३) नियमावलीसाठी मार्गदर्शक तत्त्वे खालीलप्रमाणे.--

(अ) नियत व नियंत्रण आकाशचिन्ह वातावरण निर्मितीसाठी यापूर्वी देणेत आलेले परवाने रद्द करून नव्याने नियंत्रित आकाशचिन्ह परवाने देण्याकरिता पुणे शहरामध्ये मुक्त आकाशचिन्ह वातावरणाची निर्मिती करणे.

(ब) मुक्त आकाशचिन्ह वातावणाची निर्मिती करून सार्वजनिक रहदारी व पादचाऱ्यांचे जीविताला धोका होणार नाही अशा पद्धतीने जाहिराती उभाणेस परवानगी देणे.

(क) जाहिराती व त्यांच्या स्ट्रक्चरमुळे शहराच्या सौंदर्यात बिघाड होणार नाही याची दक्षता घेणे.

(ड) आकाशचिन्ह हे महत्त्वपूर्ण माध्यमाचा सार्वजनिक हितासाठी वापर करणे.

(इ) महत्त्वपूर्ण ठिकाणांच्या उदा. पौराणिक स्थळे, प्रेक्षणिक स्थळे, नद्या, टेकड्या इत्यादीच्या अंगीभूत विशेषत:चे जतन करणे.

(ई) सार्वजनिक दृष्ट्या कला/रचनात्मक गोष्टींमध्ये वाढ होण्यासाठी आकाशचिन्हांद्वारे वाव देणे.

(उ) ट्रान्सपोर्ट प्राईज डिस्कव्हरी मेकॅनिझम तत्त्वानुसार अधिकत उत्पन्न प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक ठेका पद्धतीचा वापर करणे.

**२. शीर्षक**

या नियमावतीस "पुणे महानगरपालिका आकाशचिन्ह नियमावली २०१०" असे संबोधण्यात यावे.

**३. प्रारंभ**

सदरची नियमावली ही मान्यतेच्या दिनांकापासून अंमलात येईल व यापूर्वी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात अस्तित्वात असणाऱ्या अशा प्रकारचें सर्व नियमावली निरस्त होतील.

**४. व्याख्या**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे शेड्युल चॅप्टर ११ नुसार कोणतीही व्याख्या आकाशचिन्हासाठी असेल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका जाहिरात व फलक नियंत्रण नियमावली २००३ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे राहतील व महापालिका आयुक्त यांचेशिवाय या नियमांच्या संदर्भात दुसरा अर्थ लावणे अपेक्षित नसेल.

**५. प्रयोजन**

**५. (अ) सर्वसाधारण प्रयोजन**

(१) पुणे महानगरपालिका हद्दीत सार्वजनिक अथवा खाजगी जागेवरती (जमीन व/किंवा इमारती) सार्वजनिक दृष्टीने प्रदर्शित केलेले आकाशचिन्ह, भिंतीपत्रक, जाहिरात, फ्रेम, किऑक्स, पोस्ट, झाडांच्या सभोवतालची जाहिरात किंवा इतर कोणत्याही पद्धतीने केलेली प्रसिद्धी की जे सार्वजनिक ठिकाणावरून दिसण्यायोग्य उदा. सार्वजनिक रस्ते, ठिकाणे इत्यादीवरती खालील बाबी सोडता पूर्णपणे बंदी असेल.

(अ) मिळकतीचे/व्यावसायिक नामनिर्देश असणारे नामफलक.

(ब) खाजगी मिळकतीचे मालक/भाडेकरू हे त्यांच्या जागेमध्ये त्याच्या मिळकतीचे/व्यवसायाचे वर्णन असलेले नामफलक उभारू शकतील. असे सर्व नामफलक त्या रस्त्यानिहाय नेमून दिलेल्या आकार व परिणामातच उभारण्यात यावेत.

(क) सदर नामफलकांच्या बाबतीत एकसंधिता साधण्याच्या दृष्टीने नामफलक जमिनीपासून ३.०५ मीटर उंचीवर लावण्यात यावा. म्हणजे नामफलकाचा खालील भाग व जमिनीची उंची यामधील अंतर रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या अशा सर्व नामफलकांची उंची सर्रास ०.६० मीटर असावी. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीमधील प्रवेश/बाहेर पडण्याचा मार्ग तसेच आपत्कालीन मार्ग यांना बाधा उत्पन्न होईल अशा स्वरूपाचे नामफलक उभारण्यात येवू नयेत.

(ड) जागांचे मालक/भाडेकरू यांनी मुंबई दुकाने नोंदणी अधिनियम, १९४८ किंवा पुणे महानगरपालिकेने दिलेल्या दाखल्यानुसार संस्थेच्या नोंदणी दाखल्यावर नमूद केलेल्या संस्थेचा/मालकाचे नाव व पत्ता याशिवाय इतर विविध असणारा नामफलक उभारू नये. जाहिरात/प्रयोजक यांचा समावेश/उल्लेख असणारा नामफलक उभारण्यात येवू नये.

(इ) नामफलक उभारण्यासाठी विशेष परवानगीची आवश्यकता नाही. तथापि, सदरचे नामफलक हे नियमानुसार उभारण्यात यावेत.

(ई) नामफलकासाठी असणाऱ्या जागेचा इतर व्यवसायिक कारणासाठी दुरुपयोग झाल्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व महाराष्ट्र राज्य विद्रुपीकरण कायदा, १९९५ नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) सार्वजनिक रस्ता उदा. रेल्वे, एअरपोर्ट, डिफेन्स ॲथॉरिटी, राज्य परिवहन महामंडळ, पीएमपीएमएल. इत्यादी यांच्या मालकीच्या जागांवरती त्यांचे कामासंबंधी अनिवार्य बाबींसाठी जाहिरात उभारू शकतो.

(३) वृत्तपत्रातील जाहिरात, रेडिओ, दूरचित्रवाणी प्रसारणे, प्रदर्शने हे त्यांच्या इमारतींमध्ये त्यांच्या कामाविषयी जाहिरात करू शकतात.

(४) याबाबतीत राज्य शासन/केंद्र शासन यांनी दिलेले दिशा निर्देश ग्राह्य राहतील.

(५) साईन बोर्ड, बॅनर, बोर्डस, फुगे, ग्यॅन्ट्री, सब वे, एलईडी-प्रकाशित आणि अप्रकाशित होर्डिंग, पॅसेज शेल्टर, पोस्टर्स, चिन्हे, तात्पुरते कमानी किंवा इतर कोणत्याही प्रकारे प्रदर्शित करण्यात आलेली जाहिरात/आकाशचिन्ह यांचेसाठी सदरची नियमावली लागू असेल.

## ५. (ब) पीएमपीएमएल साठी प्रयोजन

(१) शहरामधील रस्त्यांवर असणाऱ्या कोणत्याही बस थांब्यावरती जाहिरात हक्कांसाठी पीएमपीएमएल नव्याने परवानगी देणार नाही.

(२) सदरची नियमावली ही पीएमपीएमएलच्या डेपो आणि टर्मिनल्स यांनादेखील लागू असेल त्यांचे रोलिंग स्टॉक वगळता.

## ६. जाहिरात प्रतिबंधित ठिकाणे

(अ) या नियमाव्यतिरिक्त खालील ठिकाणी जाहिरात उभारण्यास प्रतिबंध असेल--

(१) पुरातन इमारती, स्थापत्य सौंदर्य, पौराणिक तसेच पुरातत्त्व विभागाने घोषित केलेली महत्त्वाची ठिकाणे किंवा पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी निर्देशित केलेल्या डी. सी. नियमांप्रमाणे प्रतिबंधक ठिकाणे.

(२) सर्व धार्मिक किंवा प्रार्थना स्थळे.

(३) सार्वजनिक महत्त्वाची ठिकाणे.

(४) झाडांवर रंगविलेली जाहिरात व इत्यादी त्या स्वरूपाचे.

(५) दवाखाने, नर्सिंग होम व शैक्षणिक ठिकाणे.

(६) सार्वजनिक सभागृह, मैदाने.

(७) सार्वजनिक इमारती.

(८) उद्याने, बागा व सार्वजनिक वापरासाठी कायम खुल्या असणाऱ्या मोकळ्या जागा.

(९) मुळा नदी, मुठा नदी, राम नदी, कात्रज तलाव, पाषाण तलाव, अंबिल ओढा, नागझरी नाला, माणिक नाला व इतर अशा सर्व प्रकारचे प्रवाह आणि विकास विनियोजन आराखड्यामध्ये दर्शविलेली ठिकाणे, महसूल व पावसाठी पाण्याचे नियोजन आराखड्यामध्ये दर्शविलेले क्षेत्र.

(१०) पुणे शहरासाठी महाराष्ट्र राज्य प्रादेशिक टाऊन प्लॅनिंग कायदा, १९६६, बी. डी. पी. झोन व विकसन आराखडा, पुणे यामध्ये दर्शविलेले संरक्षित स्थळे त्याचबरोबर हरित पट्टा, हिल टॉप-उतार व तद्अनुषंगिक ठिकाणे.

(११) महत्त्वाचे किंवा मोठे चौक, रस्ते इत्यादी.

(१२) मोठे दगड व उघडे पाषाण.

(ब) जाहिरात/आकाशचिन्हांमुळे लगतच्या इमारतीस नैसर्गिक सूर्यप्रकाश किंवा हवेच्या प्रवाहास अडथळा निर्माण होत असल्यास अशा स्वरूपाचे आकाशचिन्ह उभारण्यात येऊ नये. तथापि, सार्वजनिक लिलावाद्वारे देण्यात आलेल्या आकाशचिन्ह हक्कांमधील नियमानुसार जाहिरात उभारता येईल. उपरोक्त नमूद दोन्हीपैकी जे नियम जास्त कडक असतील ते लागू समजावेत.

(क) चौकांमधील स्टॉप लाईनपासून ४० मीटर अंतर मागे कोणतेही आकाशचिन्ह उभारण्यात येऊ नये. सदरचा नियम इमारतींच्या छतावरील आकाशचिन्ह/जाहिरातींसाठी देखील लागू राहील.

**७. आकाशचिन्ह उभारण्यासाठी भौतिक संरचनेची आवश्यकता**

(१) आकाशचिन्ह बोर्ड हे खालील नियमांनुसार ठेक्याद्वारे दिलेल्या पूर्ण शहरापैकी एक भाग असून, तो खालील नियमांच्या अधीन असेन.

(२) सार्वजनिक किंवा खाजगी मिळकतींवरील आकाशचिन्ह हक्कांचा ठेका देण्यासाठी या नियमानुसार निविदा मागविण्यात येतील.

(३) मान्य रस्त्यांवरती अनुज्ञेय असणाऱ्या आकाशचिन्हांची (उदा. युनिपोल्स, जमिनीवरील जाहिरात/होर्डिंग्ज व छतावरील जाहिराती) संख्या ठरविण्यासाठी खालील सूत्राचा वापर करावा.

ठिकाणांची संख्या = रस्त्याची लांबी (मीटरमध्ये)/१०० मीटर प्रत्येक आकाशचिन्ह ठिकाणासाठी. ठरविण्यात आलेल्या आकाशचिन्हांच्या संख्येनुसार आकाशचिन्हांचे प्रकार व ठिकाणे यशस्वी लिलावदार निश्चित करतील व त्याठिकाणी आकाशचिन्ह उभारण्यासाठी महानगरपालिकेची आवश्यक ती मान्यता घेतील.

(४) आकाशचिन्ह/जाहिरातीच्या संरचनेचे कोणत्याही प्रकारचे प्रोजेक्शन रस्ता अथवा पदपथावरती येता कामा नये.

(५) आकाशचिन्ह उभारणेतील भौतिक संरचना आवश्यकता--

(अ) **आकार व प्रकार--**प्रथमदर्शनी वाहतूक नियमांसाठीचे औपचारिक चिन्हे जाहिरातींचे आकार व प्रकार यामधील साम्य असू नये. सांगाड्याची रचना ही सर्वसाधारणपणे नॅशनल बिल्डिंग कोडचे नियमावलीनुसार अथवा या नियमावलीमध्ये निर्देशित केल्यानुसार असावी (तक्ता क्रमांक १).

(ब) **रंग--**प्रथमदर्शनी वाहतूक नियमांच्या औपचारिक रंगाशी सुसंगत/स्वरूपाचे रंग वापरण्यात येऊ नये.

(क) **प्रकाशन--**बाह्य स्वरूपांद्वारे जाहिरात फलक प्रकाशित करण्यास परवानगी दिली जाणार नाही. तथापि, आवश्यकता असेल तरच फक्त एलईडीद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यास परवानगी देण्यात येईल.

(ड) **सामग्री--**आकाशचिन्ह उभारण्यासाठी वापरात येणारी सामग्री ही प्रदूषणविरहित, आगप्रतिरोधक व अपघातरोधक असावी व याबाबतीत संबंधित स्ट्रक्चर इंजिनियर यांची खात्री झालेली असावी.

(इ) **संरचना--**

(१) आकाशचिन्हांचे संरचनात्मक डिझाईन हे पुणे महानगरपालिकेने सूचिबद्ध केलेल्या स्ट्रक्चर इंजिनियरने प्रमाणित केलेले असावे.

(२) सदर प्रमाणपत्र हे इंडियन स्ट्रक्चर डिझाईन, स्टॅन्डर्डस ॲन्ड रिलेव्हंट कोड्स ऑफ प्रॅक्टिसचे नियमाप्रमाणे असेल.

(३) उभारण्यात आलेली लोखंडी संरचना ही सुस्थितीत ठेवण्यासाठी महानगरपालिकेने सूचित केलेनुसार योग्यप्रकारे व आजूबाजूच्या परिसराशी सुसंगत अशी रंगरंगोटी करण्यात यावी व संबंधित कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेचे क्षेत्रीय अधिकारी प्रत्येक सहा महिन्यांनी त्यांची तपासणी करतील व त्याबाबत तक्रार असल्यास, ठेकेदार हा त्यानुसार त्यात दुरुस्ती करेल अन्यथा त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

(४) आकाशचिन्हाबाबत महानगरपालिकेच्या दप्तरी असलेल्या अभिलेखामध्ये नमूद केल्यानुसार, संपूर्ण माहिती ठेकेदार त्याच्या नाव, संपर्काच्या क्रमांकासहित आकाशचिन्हाच्या खालील उजव्या कोपऱ्यात कमीत कमी ०.३० X ०.३० मध्ये प्रदर्शित करेल.

(५) ठेकेदार हा त्याच्या स्वखर्चाने प्रत्येक आकाशचिन्ह संरचनेवरती (युनिपोल्स आणि जमिनीवरती उभारण्यात येणाऱ्या जाहिरातींसाठी फक्त) महानगरपालिकेच्या सार्वजनिक संदेशासाठी एलईडी नामफलक उपलब्ध करून देईल. सदर नामफलकाचे आकारमान हे ३ मीटर X ०.३ मीटरचे राहील. ठेकेदार अशाप्रकारे महानगरपालिकेच्या सूचनेप्रमाणे उपलब्ध करून दिलेले नामफलक हे विनामोबदला प्रकाशित करेल. तद्नंतर महानगरपालिका शहरामध्ये अशा सर्व एलईडी नामफलक एका नेटवर्कमध्ये जोडले व त्याचे एका मध्यवर्ती स्थानकातून नियंत्रण ठेवील. याकामी सदर एलईडी संरचना सुस्थितीत राखण्याची व चालविण्याची जबाबदारी ही ठेकेदार यांची राहील. ठेकेदार हे याकामी महानगरपालिकेची मान्यता घेते वेळेस तसेच दरवर्षी महानगरपालिकेने सूचिबद्ध केलेल्या स्ट्रक्चर इंजिनियरचे स्ट्रक्चर स्टॅबिलिटीचे प्रमाणपत्र सादर करेल.

(६) सूचिबद्ध स्ट्रक्चर इंजिनियर हे आकाशचिन्ह संरचनेबाबत गरम वातावरण परिस्थिती, भूकंप प्रतिरोधक, मातीची धारणक्षमता, फाऊंडेशन, इमारतीची संरचना (इमारतीवरील जाहिरात) व याबाबत संबंधित आवश्यक नियमांनुसार बारकाईने परीक्षण करून प्रमाणपत्र देईल.

**तक्ता क्रमांक १**

**आकाशचिन्ह संरचनांचे अनुज्ञेय आकारमान**

| अ. क्र. | कमाल आकाशचिन्हांचा तपशील | प्रदर्शनाचा अधिकतम आकारमान (लांबी X रुंदी) | जमिनीपासून अधिकतम उंची | अटी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जमिनीवरील जाहिरात फलक | | | |
| (अ) | विकास आराखड्यातील ४५ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांसाठी. | १२ मी. X १२ मी. | १८ मी. | (अ) जमिनीपासून कमीत कमी उंची ३.५० मीटर असावी. (ब) जाहिरात फलकाचा कोणाताही भाग पदपथ व रस्त्यावर येऊ नये. (क) एलईडी/एलसीडी या व्यतिरिक्त इतर स्रोतांद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यात येऊ नये. |
| (ब) | विकास आराखड्यातील १८ ते ४५ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी. | ९ मी. X ६ मी. | १८ मी. | |
| (क) | विकास आराखड्यातील ९ ते १८ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी. | ३ मी. X ३ मी. | १८ मी. | |
| (ड) | विकास आराखड्यातील ९ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यासाठी. | लागू नाही | लागू नाही | (अ) जमिनीवर जाहिरात फलकाला परवानगी देऊ नये. |

**तक्ता क्रमांक १--चालू**

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २ | युनीपोल | ९ मी. X ९ मी. | १८ मीटर | (अ) विकास आराखड्यातील ३० मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांसाठी.<br>(ब) जमिनीपासून कमीत-कमी उंची ३.०० मीटर असावी.<br>(क) एलईडी/एलसीडी या व्यतिरिक्त इतर स्त्रोतांद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यात येऊ नये. |
| ३ | इमारतीच्या छतावरील जाहिरात. | ९ मी. X ६ मी. | ९ मीटर (इमारतीच्या छतापासून) | (अ) छतावरील जाहिरातीचे प्रोजेक्शन हे इमारत नियंत्रण रेषेच्या बाहेर येऊ नये.<br>(ब) एलईडी/एलसीडी या व्यतिरिक्त इतर स्त्रोतांद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यात येऊ नये.<br>(क) १५ मीटर उंचीपेक्षा जास्त उंचीचे आकाशचिन्ह इमारतीवर उभारण्यात येऊ नये.<br>(ड) महाराष्ट्र राज्य प्रादेशिक टाऊन प्लॅनिंग कायदा १९६६, बीडीझेड, शहर विकसन आराखड्याच्या नियमावलीत व न्यायप्रविष्ट इमारतींवरती तसेच संरचनात्मक दृष्ट्या धोकादायक इमारतीवर आकाशचिन्ह उभारण्यास परवानगी देता येणार नाही. |
| ४ | रस्ता दुभाजकावरील फलक | ०.६ मी. X ०.९ मी. | २ मीटर | (अ) दोन्ही बाजूंनी जाहिरात प्रकाशित करू नये.<br>(ब) एलईडी/एलसीडी या व्यतिरिक्त इतर स्त्रोतांद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यात येऊ नये.<br>(क) संबंधित रस्त्यावरील जाहिरात नगांची संख्या खालील सूत्रानुसार ठरविण्यात यावी.<br>नग = रस्तादुभाजकाची लांबी/५० मीटर. |
| ५ | विद्युत खांबावरील जाहिरात व किऑक्स. | १ मी. X १.२५ मी. | ३ मीटर | (अ) दोन्ही बाजूंनी जाहिरात प्रकाशित करू नये.<br>(ब) एलईडी/एलसीडी या व्यतिरिक्त इतर स्त्रोतांद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यात येऊ नये. |
| ६ | उड्डाणपूल व पुलावरील जाहिरात. | लांबी - ६ मी. | | (अ) एलईडी/एलसीडी या व्यतिरिक्त इतर स्त्रोतांद्वारे जाहिरात प्रकाशित करण्यात येऊ नये.<br>(ब) उड्डाणपुलाच्या बाहेरील बाजूच्या भिंतीवर लावण्यात यावे.<br>(क) उड्डाणपुलाच्या बाहेरील भिंतीवरील भागापेक्षा जास्त नसावा. |

**तक्ता क्रमांक १--चालू**

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ७ | फुग्यांवरील जाहिरात | जाहिरातींच्या फुग्याचे आकारमान, अधिकतम उंची आणि दोन फुग्यांमधील अंतर हे महापालिका आयुक्त वेळोवेळी देतील त्या निर्देशानुसार लागू राहील. | लागू नाही | (अ) यशस्वी लिलावदार हे त्यांच्याकडील फुगे अशाप्रकारे प्रदर्शित करतील की ज्यामुळे इतर आकाशचिन्हांना अडथळा अथवा प्रदर्शनात व्यत्यय निर्माण होणार नाही.<br>(ब) यशस्वी लिलावदार हे वायूदल, पुणे नागरी उड्डाण प्राधिकरण यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र सादर करेल.<br>(क) त्याचबरोबर यशस्वी लिलावदार हे अग्निशामक विभाग, पुणे यांचे सदर फुग्यामधील वापरात येणाऱ्या ज्वलनशील इंधनाबाबत ना हरकत प्रमाणपत्र सादर करेल. |
| ८ | बस थांब्यावरील जाहिराती. | ६ मी. X २ मी. | लागू नाही | (अ) बस थांब्यातून प्रवाशांना दोन्ही बाजूच्या येणाऱ्या बस व्यवस्थित दिसतील.<br>(ब) जाहिरात ही बसस्थानकाच्या सरंचनेचा भाग असावा. त्यासाठी बसस्थानकाच्या मूळ संरचनेत कोणताही फेरबदल करण्यात येऊ नये अथवा अधांतरीत जाहिरात लावण्यात येऊ नये.<br>(क) आकाशचिन्ह हे एलईडीवर आधारित अथवा विना एलईडी असावे. याकामी कोणत्याही बाह्यस्रोत प्रकाशित करण्यासाठी वापरण्यात येऊ नये. |
| ९ | झाडांभोवती लावलेल्या जाळीवरील जाहिरात. | ०.६ मी. X ०.६ मी. | लागू नाही | (अ) आकाशचिन्ह हे चौरोसाकृती व नेमून दिलेल्या आकाराचे असावेत.<br>(ब) आकाशचिन्ह उभारल्याबाबत झाड छाटनी अथवा झाडास कोणत्याही प्रकारचा धोका उत्पन्न होणार नाही याची काळजी यशस्वी लिलावदार घेईल.<br>(क) सदरची जाहिरात कोणत्याही प्रकारे प्रकाशित करण्यास परवानगी असणार नाही.<br>(ड) झाडावरील आकाशचिन्ह उभारण्यापूर्वी पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. |

**८. आकाशचिन्ह हक्कांच्या हस्तांतरणासाठी निविदा प्रक्रिया**

(१) या नियमावलींना अनुसरून शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांपासून आकाशचिन्ह हक्कांच्या सार्वजनिक निविदा प्रक्रियेतून प्राप्त होणारे उत्पन्न सार्वजनिक महत्त्वाची कामे, विकास कामे इत्यादींसाठी वापरण्यात येईल.

पादचारी व सार्वजनिक वाहतूक यांचे सुरक्षिततेबरोबरच शहराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक सौंदर्यास कोणत्याही प्रकारची बाधा उत्पन्न न होता शहराचा विकास करणे.

(२) महानगरपालिका हद्दीतील सध्या अस्तित्वात असणाऱ्या सर्व प्रकारच्या आकाशचिन्ह की जे सोबतच्या तक्त्यामध्ये समाविष्ट असतील/नसतील अशी सर्व आकाशचिन्ह डिसेंबर २०१० अखेर कालबाह्य ठरतील आणि त्या अनुषंगाने सदरच्या धोरणानुसार नव्याने आकाशचिन्ह उभारण्यासाठी निविदा पद्धतीने पूर्णतः नवीन वातावरणाची निर्मिती करेल.

(अ) सार्वजनिक पद्धतीने ठेका देण्यासाठी महानगरपालिका रस्ते व रस्त्यांवर उभारावयाच्या सर्व प्रकारच्या आकाशचिन्हांची अंदाजे संख्या प्रस्तुतचे नियमावलीनुसार प्रत्येक रस्तेनिहाय निविदा प्रक्रियेच्यावेळेस निश्चित करेल.

(ब) आकाशचिन्ह हक्कांसाठी करावयाचा सार्वजनिक ठेका हा प्रत्येक रस्त्यांनुसार किंवा रस्त्यांच्या समूहासाठी किंवा संपूर्ण शहरासाठी किंवा महापालिका आयुक्त ठरवतील त्यानुसार करण्यात येईल. अशा प्रत्येक ठेका/करारानुसार प्राप्त हक्कांचा कालावधी हा महापालिका आयुक्त निविदा प्रक्रियेच्या वेळेस निश्चित करतील.

(क) यशस्वी ठेकेदार हे आकाशचिन्ह उभारण्यासाठी मालकी/भाडेतत्त्वावर/अधिकार निविदा कालावधीसाठी प्राप्त करतील.

(ड) ठेका देण्यासाठी ठेकेदारांची पात्रता, तांत्रिक, आर्थिक, मनुष्यबळ, यांत्रिक याबाबत आवश्यक अटी, शर्ती महानगरपालिका टेंडर काढतेवेळी तयार करेल.

(इ) निविदा प्रक्रियाद्वारे यशस्वी ठेकेदारांना प्राप्त झालेल्या आकाशचिन्ह हक्कांच्या परिपूर्ण वापराबाबत ठेकेदार हे स्वतः जबाबदार राहतील.

(ई) निविदेची सुरक्षा अनामत अटी व शर्ती, ठेक्याची रक्कम आणि व्यापारी तरतुदीबाबतची माहिती महानगरपालिका निविदा प्रक्रियेचे वेळेस माहिती प्रसृत करेल.

(उ) निविदा प्रक्रियेसाठी महानगरपालिकेने निश्चित केलेले सुरक्षा अनामत रक्कम जर यशस्वी ठेकेदार हे/यांनी मिळालेले काम करण्यास असमर्थ ठरल्यास, त्यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

(ऊ) महानगरपालिकेकडील निविदा प्रक्रियेद्वारे यशस्वी ठेकेदाराने आकाशचिन्ह हक्क प्राप्त केल्यानंतर सदर यशस्वी ठेकेदार नेमून दिलेल्या प्रकाराचे आकाशचिन्ह उभारण्यासाठी आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे मुंबई प्रांतिक अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियमावली २००३ चे नमुना 'अ' व 'ब' नुसार मान्यतेसाठी अर्ज दाखल करतील व सदर अर्जांना आकाशचिन्ह उभारण्यासाठी नमुना 'क' नुसार परवानगी देण्यात येईल.

(ए) यशस्वी ठेकेदाराने त्यांना दिलेल्या रस्ता किंवा रस्त्याच्या समूहावरील आकाशचिन्ह हक्क प्राप्त केल्यानंतर, त्याला/त्यांना नेमून दिलेल्या जागांवरती त्याच्या/त्यांच्या व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या पूर्व परवानगीशिवाय इतर अनधिकृत जाहिरात फलक लागणार नाहीत याची दक्षता घेणे. असे झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी ठेकेदाराची राहील.

(ऐ) ठेका/कराराच्या कालावधीत आकाशचिन्ह उभारण्यासाठी नेमून दिलेल्या जागेमध्ये बदल करणेसाठी सदर ठेकेदाराने समर्थक कारण दिल्याखेरीज आकाशचिन्हाच्या जागेमध्ये बदल करण्यास महानगरपालिका परवानगी देणार नाही.

(ओ) जर एखाद्या महत्त्वाच्या समारंभासाठी आवश्यकतेनुसार जाहिरात फलक स्थलांतरित करतेवेळेस मिळकतदाराशी वाद उत्पन्न झाल्यास, यशस्वी ठेकेदारांच्या अशाप्रकारच्या तक्रारी प्रथम सदरची जाहिरात फलक स्थलांतरित केल्यानंतरच दाखल करून त्यावर विचार केला जाईल. तक्रार दाखल करून घेणे अथवा फेटाळणे याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील व त्यामुळे ठेक्याद्वारे मिळणारे उत्पन्न व अटी व शर्तीमध्ये कोणत्याही प्रकारे बदल केला जाणार नाही.

(३) त्याचबरोबर यशस्वी ठेकेदारांना निविदा प्रक्रियेमध्ये निश्चित केलेल्या निविदा रकमेबरोबरच महानगरपालिकेने व इतर अन्य प्रशासनाने लावलेले सर्व प्रभारकर, लेव्ही इत्यादी महानगरपालिकेकडे जमा करेल.

(४) ठेकेदाराने ठेक्याची ठरलेली रक्कम तसेच इतर सर्व लागू प्रभार महानगरपालिकेकडे सहा महिन्याच्या आत जमा करणे आवश्यक आहे.

(५) यशस्वी ठेकेदार यांनी पुणे महानगरपालिकेचे नियमानुसार त्यांना नेमून दिलेला रस्ता/रस्त्याचा समूह यावरील सर्व प्रकारचे आकाशचिन्ह उभारण्याचे संपूर्ण हक्कानुसार सार्वजनिक/खाजगी जागेवरती आकाशचिन्ह उभारण्यासाठी अशा जागा मालकांची/संस्थांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशा प्रत्येक आकाशचिन्ह उभारण्यासाठी प्रत्येक ठिकाणांच्या मालकांचे/संस्थांचे वेगवेगळी पूर्व परवानगी यशस्वी ठेकेदाराने घेणे अत्यावश्यक राहील. अशा स्वरूपाच्या परवानगीसाठी जागा मालकाशी/भाडेकरूशी करारनामा/मेमोरेन्डम करून ते आकाशचिन्ह संरचना उभारण्यासाठी करावयाच्या मागणी अर्जासोबत महानगरपालिकेकडे दाखल करणे आवश्यक आहे.

(६) महानगरपालिकेच्या जागांवर उभारावयाचे लगतचा आकाशचिन्हांमधील कमीत कमी अंतर २० मीटर आहे व त्याचबरोबर त्यासाठी सदरच्या नियमावलीचे सर्व नियम लागू राहतील.

**९. शास्ती**

(१) एखादी व्यक्ती अथवा संस्था की जी दिलेल्या नियमावलीला विरोध करून कोणत्याही स्वरूपाचे, तात्पुरते अथवा कायमस्वरूपी आकाशचिन्ह/जाहिरात उभारेल ती व्यक्ती अथवा संस्था मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३९२ व महाराष्ट्र राज्य विद्रुपीकरण कायदा १९९५ चे कलम ३ नुसार दंडास/अभियोगास पात्र राहील.

(२) उभारण्यात आलेल्या कोणतेही आकाशचिन्ह संरचनामुळे किंवा/अथवा त्याच्या कोणत्याही भागामुळे पादचाऱ्यास अथवा रहदारीस धोका किंवा अडथळा निर्माण झाल्यास भारतीय दंड संविधानाच्या नियमावलीनुसार आकाशचिन्ह हक्क प्राप्त असणाऱ्या यशस्वी ठेकेदारावर सर्वस्वी ज़बाबदार राहील.

(३) सदर धोरणाच्या कोणत्याही विवादाबाबतीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २४४, २४५ त्याचबरोबर ३९२ व ३९३ *(४)* चे अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल. त्याचबरोबर उपरोक्त उल्लेख केल्यानुसार महाराष्ट्र राज्य विद्रुपीकरण कायदा १९९५ लागू असेल.

(४) त्याचबरोबर अनधिकृतरित्या आकाशचिन्ह उभारल्यास संबंधित जागा मालक/भाडेकरू किंवा यशस्वी ठेकेदार यांना दंड/अभियोग लादण्यात येईल. त्याचबरोबर अशा आकांशचिन्हांवरील जाहिरातीचा मालक किंवा संस्था ही देखील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व महाराष्ट्र राज्य विद्रुपीकरण कायदा १९९५ चे कलम ३ नुसार दंडास/अभियोगास पात्र असतील.

**१०. कला/रचनात्मकदृष्ट्या सुविधा व वाव**

(१) पुणे महानगरपालिका दरवर्षी सामाजिक संदेशाच्याबाबत प्रसिद्ध करणाऱ्या उदा. सामाजिक जागृती, सामाजिक स्वास्थ्य, शिक्षण, बाल आरोग्य, पर्यावरण, राष्ट्रीय एकात्मता इत्यादीबाबत काम करणाऱ्या संस्थांचे आभार मानन्यासाठी समारंभाचे आयोजन करेल व विजेत्या संस्थेस प्रमाणपत्र देईल.

(२) अशा विजेत्या संदेशांचे नामफलक शहरामधील सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी प्रदर्शित करेल.

**टीप--** मा. मुख्य सभेने जाहिरात धोरणास मान्यता दिली असल्याने सदरचे धोरणाचे प्रतित ज्या ज्या ठिकाणी नियमावली हा शब्द आला असेल त्या ठिकाणी नियमावली ऐवजी धोरण असे वाचावे.

**महेश पाठक,**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे.

पुणे, २२ ऑगस्ट २०११.

महाराष्ट्र शासनाचे साप्ताहिक राजपत्र हे मुद्रक - प्रकाशक व संपादक नरेश महादेवराव गोटे, व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, येरवडा, पुणे-६ यांनी शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे अखत्यारीत येरवडा कारागृह मुद्रणालय, कारागृह आवार, येरवडा, पुणे-६ येथे छापून प्रसिद्ध केले.